# अधीक्षक अभियंता,

# रत्नागिरी सा.बां.मंडळ, रत्नागिरी

## माहिती अधिकार २००५

## नागरीकांची सनद

## वर्ष २०१२.

# १. प्रस्तावना.

महाराष्ट्र शासनाच्या अत्यंत गौरवशाली परंपरा असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत गेल्या सव्वीस वर्षापासून यशस्वीपणे कार्यरत असलेले व कोकणाचे नाते मुंबई या आर्थिक राजधानी असलेल्या नगरीशी जोडून, कोकणातील नागरीकांच्या विकासाला भव्य प्रवेशद्वार खुले करणारे रत्नागिरी सा.बां.मंडळ,रत्नागिरी हे महत्वाचे कार्यालय आहे. सार्वजनिक बांधकाम विभागातील रत्नागिरी सा.बां.मंडळ,रत्नागिरी हे कार्यालय जयस्तंभ, रत्नागिरी येथे कार्यरत असून, कोकणातील नागरीकांशी बांधीलकी जपण्यास कटीबध्द आहे. तसेच महाराष्ट्रात आय.एस.ओ.९००१-२००० मानांकन मिळालेले रत्नागिरी सा.बां.मंडळ कार्यालय असून, त्यास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.मोहितेपाटील यांनी गौरविलेले आहे. ही बांधीलकी रत्नागिरी सा.बां.मंडळ,रत्नागिरी या सनदेद्वारे जाहिर करत असून ती स्विकारत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्धारीत केलेल्या व पथदर्शीत केलेल्या सार्वजनिक सेवा तत्परतेने, सौजन्यपूर्वक व सन्मानपूर्वक वागणूकीने उपलब्ध व्हाव्यात व नागरीकांचे सामाजिक प्रश्न सहानुभूतीपूर्वक सोडवावेत हा दृष्टीकोन तसेच सर्वसामान्य नागरीकांचे सार्वजनिक बांधकाम विभागा विषयीचे हक्क त्यांच्या पर्यन्त प्रगतीच्या व विकासाच्या वाटेने अतिशय सुलभतेने पोहचविण्याचा ध्यास आहे.

रत्नागिरी सा.बां.मंडळांतर्गत रत्नागिरी व सिंधुदुर्ग या दोन जिल्हयांचा समावेश होतो. हया जिल्हयांचा विकास, प्रगती व नागरीकांचे प्रश्न याचा विचार करुनच ही सनद तयार करण्यात आली आहे.

१. आपल्या भारत देशाची धमनी असणारे व हया मंडळाच्या कार्यक्षेत्रात येणारे राष्ट्रीय महामार्ग अतिशय उत्तम दर्जाचे करणे.
२. रस्ते विकास योजनेतील या मंडळाच्या कार्यक्षेत्रातील रस्त्यांची नवीन बांधकामे, सुधारणा तसेच त्यावरील मोठे पूल, लहान पूल, मोऱ्या यांची बांधकामे उत्तम दर्जाची व सुरक्षित अशी करणे.
३. या मंडळाच्या कार्यक्षेत्रांतर्गत असलेल्या इमारती, रस्ते व पूलांची नियतकालीक देखभाल व दुरुस्ती उपलब्ध होणाऱ्या निधीतून प्रभावीपणे करणे व सेवा व सुविधांचा स्तर उंचावत नेणे.
४. या मंडळ कार्यालयाशी संलग्न असलेल्या इतर सर्व शासकीय विभागांना तांत्रिक सल्ला देणे व शासकीय कामकाजात सुसुत्रता ठेवणे.

५. हया मंडळा अंतर्गत असलेल्या सर्व विभागांच्या अखत्यारीतील ठेकेदारांची नोंदणी प्रमाणपत्रे व विविध ना हरकतींचे दाखले विहित कालावधीत निर्गमित करणे.

६. हया मंडळ कार्यालयात व मंडळाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालयात प्रतिसाद वेळापत्रक प्रदर्शित करणे.

७. आपत्कालीन व्यवस्थेसाठी तात्काळ अभियांत्रिकीशी संबंधीत आवश्यक ती कामे करणे व मदत करणे.

८. हया मंडळ कार्यालयात व मंडळाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालयातून कर्मचारी वर्गाची कर्तव्य व जबाबदाऱ्या फलकावर जाहिररित्या प्रदर्शित करणे.

९. हया मंडळ कार्यालयात व मंडळ कार्यालयाचे अखत्यारीतील प्रत्येक कार्यालयात ठरवून दिलेल्या दिवशी व वेळी सर्वसामान्य जनतेची गाऱ्हाणी / तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावीपणे निराकरण करणे.

१०. माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत हया मंडळा अंतर्गत मागितलेली माहिती संबंधीतांना विहीत मुदतीत उपलब्ध करुन देणेबाबत समक्ष स्तरावर तत्पर कार्यवाही करणे.

११. कार्यालयांच्या कामकाजात सातत्य ठेवून व आधुनिकता आणून हया मंडळाच्या सर्व कार्यालयांची व सार्वजनिक बांधकाम विभागाची लोकाभिमुखता वाढविणे.

१२. संगणीकरणाबाबत हया मंडळा अंतर्गत विभागीय कार्यालये यांना अवगत करणे व नेटवर्कने जोडणे. प्रादेशिक कार्यालय व मंत्रालय यांना नेटवर्कद्वारे आवश्यक व तातडीची माहिती त्वरीत उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशिल राहणे.

१३. हया मंडळा अंतर्गत आवश्यक व अदययावत विविध माहिती त्वरीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) उपलब्ध करणे व अद्ययावत करणे.

१४. सर्व विषयाची अनुसूची तयार करणे व निपटारा करणेचा विहित कालावधी ठरविणे.

१५. कार्यालयांमध्ये राजीव गांधी अभियाना अंतर्गत सर्व अभिलेखे अद्ययावत करणे व त्याची वर्गवारी करुन अभिलेख कक्ष नोंदवहीसह अद्ययावत करणे.

१६. हया मंडळाच्या कामकाजात पारदर्शकता व सुसुत्रता आणणे व गतिशिल प्रशासकीय कामकाजचा अवलंब करणे.

१७. हया मंडळांतर्गत व मंडळाचे अखत्यारीतील सर्व कार्यालयामध्ये अतिशय सौजन्यपूर्ण सेवाभावी व उत्साही वातावरण ठेवणे.

१८. दैनंदिन कामकाजात आधुनिकता, गतिमानता व गुणवत्ता आणणेसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे व सार्वजनिक बांधकाम विभागाची प्रतिमा उज्वल करणे.

१९. नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

**२. या मंडळ कार्यालयाची बांधीलकी व नागरीकांची जबाबदारी.**

**मंडळ कार्यालयाची बांधीलकी.**

वरील सर्व कर्तव्य पार पाडतांना रत्नागिरी सा.बां.मंडळ, रत्नागिरी

अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील.

ब) सौजन्यपुर्ण व आपुलकीची भावना ठेवून कामाचा वेळेत निपटारा करेल.

क) पारदर्शकता व निष्ठा ठेवील.

यासाठी वेळोवेळी विविध परवानापत्रे / प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी कार्यपध्दती, पत्रके नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करण्यात येतील.

**२. नागरिकांची जबाबदारी-**

शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचेशी नागरिकांची वर्तणूक सौजन्यपूर्वक असावी.

नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावी.

नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.

विहीत केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरु नये.

सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.

नागरिकांनी स्वेच्छेने अतिक्रमणे दूर करावीत व पुन्हा सरकारी जागांवर अतिक्रमणे करु नयेत.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असणाऱ्या वृक्षराजींचे जतन ही नागरिकांची सुध्दा जबाबदारी राहील.

नागरिकांनी कायदेशीर तरतूदी, नियम, अलिखीत संकेत यांचे पालन करावे.

नागरिकांनी सार्वजनिक हित, एकात्मता व अखंडता जोपासण्यासाठी सहकार्याची भावना ठेवावी.

**३. रत्नागिरी सा.बां.मंडळ रत्नागिरी कार्यालयाची रचना**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रादेशिक स्तरावरील मुख्य अभियंता हे सर्वोच्च तांत्रिक अधिकारी असून त्यांचे मुख्यालय मुंबई या ठिकाणी आहे. मुंबई प्रादेशिक विभागाच्या मुख्य अभियंत्यांचे अखत्यारीत जयस्तंभ रत्नागिरी येथे अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, रत्नागिरी हे रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील कामांची अंमलबजावणी व प्रशासनिक नियंत्रण याची जबाबदारी सांभाळतात.

रत्नागिरी सा.बां.मंडळां अंतर्गत रत्नागिरी जिल्हयात राज्यक्षेत्रा कडील कामांची अंमलबजावणी करणेसाठी दोन विभागीय कार्यालये, स्थानिक क्षेत्रासाठी दोन विभागीय कार्यालये व तसेच रस्ते सर्वेक्षण कामे करणेसाठी मार्ग प्रकल्प विभाग कार्यरत आहे. तसेच सिंधुदुर्ग जिल्हयातील राज्यक्षेत्राकडील कामांच्या अंमलबजावणीसाठी दोन विभागीय कार्यालये कणकवली व सावंतवाडी या मुख्यालयी आहेत व स्थानिक क्षेत्रासाठी ओरोस जिल्हा मुख्यालय येथे एक विभागीय कार्यालय कार्यरत आहे.

राष्ट्रीय महामार्गासाठी रत्नागिरी व सिंधुदुर्ग या दोन्ही जिल्हयांसाठी एक विभाग कार्यरत असून त्याचे मुख्यालय रत्नागिरी येथे आहे.

विभागीय कार्यालयाचे प्रशासनिक नियंत्रण कार्यकारी अभियंता सांभाळतात. या मंडळा अंतर्गत एकूण ९ कार्यकारी अभियंता कार्यरत आहेत.  सर्वसाधारणपणे उप अभियंत्यांकडे तालुक्याचे कार्यक्षेत्र आहे.

या मंडळांतर्गत राज्यक्षेत्र/स्थानिक क्षेत्र व सर्वेक्षण विभागाकडील कार्यभार दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ क्र | विभागाचे नांव | कार्यक्षेत्र (तालुका निहाय) |
|---|---|---|
| १ | सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण | मंडणगड,दापोली,खेड, चिपळूण गुहागर. |
| २ | सार्वजनिक बांधकाम विभाग उत्तर रत्नागिरी | संगमेश्वर,रत्नागिरी,लांजा,राजापूर. |
| ३ | सार्वजनिक बांधकाम विभाग दक्षिण रत्नागिरी | संपूर्ण राष्ट्रीय महामार्गाची लांबी. |
| ४ | सार्वजनिक बांधकाम विभाग कणकवली | वैभववाडी,देवगड,कणकवली,कुडाळ व मालवण तालुक्याचा काही भाग. |
| ५ | सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी | कुडाळ,मालवण,वेंगुर्ला,सावंतवाडी,दोडामार्ग |
| ६ | मार्ग प्रकल्प विभाग रत्नागिरी | रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील सर्वेक्षण. |
| ७ | जिल्हा परिषद बांधकाम विभाग रत्नागिरी | गुहागर, संगमेश्वर,रत्नागिरी,लांजा,राजापूर |
| ८ | जिल्हा परिषद बांधकाम विभाग चिपळूण | मंडणगड,दापोली,खेड, चिपळूण गुहागर. |
| ९ | जिल्हा परिषद बांधकाम विभाग सिंधुदुर्ग | संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्हा स्थानिक क्षेत्र |

कार्यकारी अभियंता यांचे अधिकार क्षेत्रातील सार्वजनिक बांधकाम विभाग हा खऱ्या अर्थाने माहितीचा स्त्रोत असतो. कुठल्याही बांधकामाची सविस्तर माहिती अगदी सुरुवातीपासून संबंधीत कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात मिळू शकते.

हया मंडळात दक्षता व गुणनियंत्रण मंडळाशी संलग्न एक उपविभाग रत्नागिरी येथे कार्यरत आहे. सदर कार्यालयाचे मुख्य काम म्हणजे मंडळ कार्यालयांच्या कार्यक्षेत्रातील बांधकाम साहित्याची प्रयोगशाळेत चाचणी करणे हे आहे.

त्याचप्रमाणे हया मंडळा अंतर्गत येणारी विशिष्ट कामे उदा. यांत्रिकी, विद्युतीकरण, संकल्पचित्र, वास्तुशास्त्रीय नकाशे / आराखडे तयार करणे, बगीच्यांचे निर्माण व देखभाल इत्यादि कामे यांत्रिकी अभियंते, विद्युत अभियंते, संकल्पचित्र मंडळ, वास्तुशास्त्रज्ञ कार्यालय, उपवने व उद्याने शाखा यांच्या मार्फत करण्यात येतात.

प्रस्तावनेत नमूद केलेल्या सार्वजनिक सेवा सार्वजनिक बांधकाम विभाग पुरवित असतो. हया विभागांतर्गत कामांच्या अंमलबजावणीसाठी सा.बां.नियमावली, लेखा संहिता, विनिर्देश, वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इत्यादीचे काटेकोरपणे पालन क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून केले जाते

## **<u>४.  सा.बां.मंडळाचे कार्यक्षेत्र</u>**

हया मंडळ कार्यालयाचे कार्यक्षेत्र रत्नागिरी व सिंधुदुर्ग या दोन जिल्हयात असून एकूण १६ तालुक्यात विखुरलेले आहे. हया मंडळा अंतर्गत कार्यरत रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील विभागांचे भौगोलिक क्षेत्र अनुक्रमे ८२५९ चौ.कि.मी., ५११८ चौ.कि.मी. आहे व सुमारे ३०० कि.मी. सागरी किनारपट्टी आहे.

हया मंडळाच्या कार्यक्षेत्रा अंतर्गत पनवेल-महाड-पणजी राष्ट्रीय महामार्ग क्र.१७ कि.मी.११५४/३०० ते कि.मी. ४७५/२१० म्हणजेच कशेडी ते पत्रादेवी महाराष्ट्राच्या सिमेपर्यंत (गोवा हद्द) हा भाग येतो व रत्नागिरी कोल्हापूर राष्ट्रीय महामार्ग क्र.२०४ कि.मी. ००/०० ते कि.मी. ७३/५१५ रस्ता येतो. हया मंडळाच्या कार्यक्षेत्रांतर्गत रत्नागिरी जिल्हयातील जोते क्षेत्रफळ १,३१,६६१ चौ.मी. असून निवासी इमारतींचे जोते क्षेत्रफळ ५०,५१३ चौ.मी. आहे. तसेच सिंधुदुर्ग जिल्हयातील प्रशासकीय इमारतींचे जोते क्षेत्रफळ १,१५,२४५ चौ.मी. असून निवासी इमारतींचे जोते क्षेत्रफळ ६६,५४२ चौ.मी. आहे

## **५. मंडळां अंतर्गत कार्यपूर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता व खाजगीकरण.**

### **<u>अ. कार्यपूर्तीचे वेळापत्रक</u>**

रत्नागिरी सा.बां.मंडळ,रत्नागिरी कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील ठेकेदारांची नोंदणी, विविध ना हरकत प्रमाणपत्रे मिळण्यासाठी लागणारा कालावधी, त्यास सक्षम अधिकारी इत्यादीची माहिती तसेच रस्ते,

पुल व इमारती आणि इतर कामांविषयीची माहिती कार्यपूर्तीचे वेळापत्रकात (परिशिष्ट-ब) नमूद केली आहे. अर्जाचा विहित नमुना व जोडावयाची आवश्यक कागदपत्रे याची माहिती विहित फी भरुन संबंधित विभागीय कार्यालयाला मिळू शकेल

नैसर्गीक आपत्ती कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न इ. उद्‌भवल्यास या वेळापत्रकातील कार्यपूर्तीच्या कालावधीत वाढ होऊ शकेल

**<u>ब) माहितीची सुलभता</u>**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या वेबसाईटवरुन(संकेत स्थळावरुन) वेळोवेळी सादर केल्या जाणाऱ्या मंडळा अंतर्गत माहितीचा तपशील व आकडेवारीचा तपशील जनतेला सुलभतेने उपलब्ध होईल.

**❖ या मंडळांतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांपैकी सर्वात महत्वाच्या व जिव्हाळयाच्या योजना म्हणजे साकव बांधणी कार्यक्रम व सागरी महामार्ग.**

रत्नागिरी  व सिंधुदुर्ग हे दोन जिल्हे डोंगराळ प्रदेशात मोडत असून पावसाळयात लहान मोठया नाल्यांना व ओढयांना पूर येत असल्याने ते ओलांडून जाणे अशक्य होते. परिणामी ग्रामस्थांची मोठी गैरसोय होत असे. ही अडचण किमान खर्चात दूर करण्यांसाठी हे काम लवकर होण्यासाठी सन १९८५ पासून साकव कार्यक्रमातूनही साकवांची कामे हाती घेण्यांत आलेली आहेत.
सुरवातीला बहूतांशी साकव हे लोखंडी सांगाडयाचे  बांधण्यांत आले. सन १९८१ पासून मोठया प्रमाणांत बांधण्यांत आलेले लोखंडी साकव कोकणातील खाऱ्या व दमट हवामानामुळे गंजण्याचे व नादूरुस्त होण्याचे प्रमाण वाढले, किंबहूना काहीवेळा दूरुस्ती अभावी पडण्याचे प्रसंग उद्‌भवले.यास्तव सार्वजनिक बांधकाम मंडळाने साकल्याने विचार करुन दिनांक ६/५/२००४ च्या परिपत्रकानुसार लोखंडी डेकींगचे साकव बांधण्यांत येऊ नयेत व पूढील साकव आर.सी.सी. स्लॅबचे बांधण्यांत यावेत अशा सूचना दिल्या.

आर.सी.सी. स्लॅबचे नमूना संकल्पन नसल्यामुळे सार्वजनिक बांधकाम मंडळ, रत्नागिरी मार्फत १.५० मीटर व २.५० मीटर रुंदीच्या साकवांकरिता नमूना संकल्पन तयार करुन दि. ५/११/२००४ रोजी रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयांतील साकव बांधण्याकरिता नमुना संकल्पन वितरीत केले आहे व त्यानुसार साकव बांधकाम करण्यांत येत आहे.

ही योजना सुरु झाल्यानंतर कोकणातील विशिष्ट भौगोलीक परिस्थिती नदया/खाडया व तेथील लहान गांवे/वाडया/ व वाढत्या वस्त्या यांना ३ कि.मी. अंतराची अट पाळून साकव बांधणे अडचणीचे ठरु लागले, त्यामुळे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दि. ४/१०/१९९० च्या शासन निर्णयान्वये सदरची अट १ कि.मी. अंतरापर्यंत शिथिल करण्यांत आली. सदर अट शिथिल झाल्यामुळे अनुज्ञेय साकवांच्या संख्येत वाढ होत आहे.

तथापी बांधकाम साहित्य मंजूरी, यंत्रसामुग्री यामध्ये मोठया प्रमाणांत भाववाढ झाल्याने दि.१५/१/१९९६ च्या परिपत्रकानुसार प्रत्येक साकवाची वित्तीय मर्यादा रु. १०.०० लक्ष पर्यंत वाढविण्यांत आली होती तद्नंतर दिनांक ३०/१०/२००७ च्या परिपत्रकानुसार सदर वित्तीय मर्यादा प्रत्येक साकवासाठी रु.२०.०० लक्ष इतकी वाढवण्यांत आली आहे.

**सागरी महामार्ग.**

या मंडळांतर्गत रत्नागिरी जिल्हयाची सागरी महामार्गाची आखणी बाणकोट, वेळास, केळशी, आडे, अंजर्ले, दापोली, दाभोळ, गुहागर, जयगड, रत्नागिरी, भाटये, पूर्णगड ते आंबेरी पूल अशी आहे.

**रत्नागिरी जिल्हयातील सागरी महामार्गाची लांबी बाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | कामाचा वाव | लांबी (कि.मी.) |
|---|---|---|
| १. | एकूण लांबी | २५०.०० |
| २. | बांधकाम पूर्ण झालेली लांबी | २४४.६२५ |
| ३. | नव्याने बांधावयाची लांबी | ५.३७५ |

नव्याने बांधावयाच्या लांबीत मुख्यत्वे करुन केळशी पूल, नाटे-जैतापूर पूल, या पूलांचे जोडरस्तेचा समावेश आहे. नव्याने बांधावयाची लांबी ५.३७५ कि.मी. (५.१०० कि.मी. केळशी पूल जोडरस्ता, ०.२७५ कि.मी. नाटे-जैतापूर पूलाचा जैतापूर बाजूचा जोडरस्ता अशी आहे.) यापैकी ०.२७५ कि.मी. लांबी मार्च २०११ पर्यंत पूर्ण होईल. फक्त केळशी पूलाच्या जोडरस्त्याची ५.१० कि.मी. लांबी शिल्लक राहील.

**रत्नागिरी जिल्हयात एकूण २० मोठे पूल सागरी महामार्गावर येत असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे**

| | | |
|---|---|---|
| १) पूर्ण झालेले पूल | वेळास, आडे, अंजर्ला, रोहिले, हेदवी, तवसाळ, वरवडे, नेवरे, मालगुंड, आरे (कोंतवडे),साखरतर, भाटये, पावस, पूर्णगड, काजिरभाटी,दांडे | १६ पूल |
| २) अर्थसंकल्पात समाविष्ट असलेले प्रगतीपथावरील पूल | केळशी, नाटे-जैतापूर | २ पूल |
| ३)मंजूर नसलेले पूल | दाभोळ,जयगड | **२ पूल** |
| **एकूण -** | | **२० पूल** |

केळशी पूलाचे व त्याच्या जोडरस्त्याचे बांधकाम पर्यावरण विषयक बाबीमुळे स्थगित असून स्थगिती उठविण्यांची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. तोपर्यंत बाणकोट ते देव्हारे रा.मा.७० चा भाग (लांबी १४ कि.मी.) व देव्हारे मांदीवली केळशी प्रजिमा-२ (लांबी १४ कि.मी.) या पर्यायी मार्गाने वाहतूक सुरु आहे. सदर दोन्ही रस्ते एक पदरी डांबरी पृष्ठभागाचे असून त्यापैकी देव्हारे मांदीवली केळशी रस्त्याचे सुधारणेचे काम केंद्रीय मार्ग निधी योजनेत प्रगतीत आहे.

**जिल्हा : सिंधुदुर्ग**

सागरी महामार्गाची सिंधुदूर्ग जिल्हयाची आखणी तिर्लोट-आंबेरी पूल, पडेल, आचरापार, कालावल, कोंळब, कुंभारमठ, तारकर्ली, वेंगुर्ला, शिरोडा, किरणपाणी अशी आहे.

**सिंधुदूर्ग जिल्हयातील सागरी महामार्गाची लांबीबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | कामाचा वाव | लांबी (कि.मी.) |
|---|---|---|
| १. | एकूण लांबी | १४२.०२८ |
| २. | बांधकाम पूर्ण झालेली लांबी | १४२.०२८ |
| ३. | नव्याने बांधावयाची लांबी | ०.०० |

सिधुदूर्ग जिल्हयात एकूण ११ मोठे पूल सागरी महामार्गावर येत असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) पूर्ण झालेले पूल | मोंड (वाडातर), आचरा, कालावल, कोंळब, केळूस, मोचेमाड, टाक(रेड्डी), तारकर्ली, मीठबाव, तेरेखोल(सातर्डा) तिर्लोट-आंबेरी | ११ पूल |
| २) अर्थसंकल्पात समाविष्ट प्रगतीपथावरील पूल | | -- |
| **एकूण** | **-** | **११ पूल** |

**क.खाजगीकरण.**

विशेषतः शहरी भागाच्या विकास कामांसाठी व मोठया प्रकल्पांसाठी अर्थसंकल्पातून उपलब्ध होणारा अल्प निधी व काळाची गरज, या कारणांमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने विकास कामांमध्ये खाजगी क्षेत्राचा सहभाग "बांधा वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वावर सुरु केला आहे. यामुळे ग्रामीण भागाकडे अधिक विकास निधी उपलब्ध करणे शक्य होणार आहे. कार्यक्रमाची परिणामकारक, जनतेचे अभिप्राय इत्यादीचा अभ्यास करुन पुढील दिशा व धोरण शासन स्तरावर ठरविले जाईल.

हया मंडळांतर्गत एका रस्त्याचे काम खाजगीकरणातून पूर्ण झाले आहे.

**६. रत्नागिरी सा.बां.मंडळ, रत्नागिरी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितता.**

सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यांची सुरक्षितता वाढविण्यासाठी अपघात निवारण समिती स्थापन केली आहे. ही समिती प्रत्यक्ष पाहणी करुन रस्त्यांवरील अपघात प्रवण स्थळे शोधते व अशा स्थळांची सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचविते.

अपघात निवारा समितीने या मंडळाचे कार्यक्षेत्रातील रस्त्यांची प्रत्यक्ष पाहणी करुन सुचविलेल्या अपघात प्रवण स्थळांची सुधारणा व उपाययोजना टप्प्या-टप्प्याने हाती घेण्यात येत आहे. यामध्ये प्रामुख्याने ६५० अपघात प्रवण स्थळे समितीने सुचविली असून त्यापैकी प्राधान्यक्रमाने ४३५ अपघात प्रवण स्थळांची सुधारणा मंडळ कार्यालयाने केली आहे व २१५ स्थळांची सुधारणा टप्प्या-टप्प्याने हाती घेण्यात येणार आहे. या मंडळांतर्गत रस्ते सुरक्षिततेवर भर देण्यात येत असून तपशीलवार व आवश्यक असे माहिती फलक रस्त्यांवर लावण्यात येतात, जेणेकरुन रस्ते वाहतुकीस पादचाऱ्यांसह सर्वांना सर्वकाळ सुरक्षित ठेवण्याचा मानस आहे.

**गाऱ्हाण्यांचे निराकरण, सनदेचा आढावा व जनसामान्यांची छाननी.**

**अ. गाऱ्हाणी/तक्रारी यांचे निराकरण.**

विभागाबाबत अथवा काही कामा बाबत गाऱ्हाणे/तक्रार असतील तर, त्यासाठी नागरिकांनी ज्या विशिष्ट कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/तक्रार असेल तर त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालय प्रमुखांकडे तक्रार नोंदवावी म्हणजे उदाहरणार्थ - उपविभागीय कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/तक्रारी असल्यास विभाग कार्यालय प्रमुखांकडे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचेकडे गाऱ्हाणे मांडावे, व विभाग कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/तक्रार असल्यास मंडळ कार्यालयाच्या अधीक्षक अभियंत्यांकडे गाऱ्हाणे मांडवे. मंडळ कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/तक्रार असल्यास मुख्य अभियंता यांचेकडे गाऱ्हाणे मांडावे. अशा गाऱ्हाणी/तक्रारीचे निराकरण वरिष्ठ कार्यालयाकडून करण्यात येईल. गाऱ्हाणी/तक्रारी नोंदविण्यासाठी प्रत्येक कार्यालयात स्वतंत्र पेटी ठेवण्यात येईल.

गाऱ्हाणी समक्ष भेटीत/पत्राने वा ई-मेलद्वारेही नागरिक मांडू शकतात

**ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा/सिंहावलोकन**

हया मंडळाच्या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्तता तथा परिणामकारकतेचा आढावा घेण्यात येईल व त्याचा अहवाल प्रसिध्द करण्यात येईल

**क. जनसामान्यांकडून सुचना**

हया मंडळाची ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सुचनांचा गांभिर्यपुर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवुन आणता येईल. ही नागरिकांची सनद स्वतःहून काही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा उपभोगणाऱ्या नागरिकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

**८. नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी.**

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत हया मंडळ कार्यालयाच्या या नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी दिनांक १ जून २००७ पासून करण्यास मंडळ कार्यालय कटिबध्द आहे.

सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन नागरिकांच्या प्रतिक्रिया/अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सुचनांचा यथोचित आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतील

रत्नागिरी सा.बां.मंडळ रत्नागिरी खात्रीपुर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. हया मंडळाच्या अखत्यारीतील कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना संवेदनशील, सौजन्यपुर्ण व मदत करण्याच्या भावतेने वर्तणूक मिळेल. ग्राहक केंद्रित सेवेची उद्दिष्टे प्राधान्याने अंगीकारुन ग्राहकांना त्वरीत प्रतिसाद दिला जाईल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशिर करण्यासाठी नागरिकांचा सल्ला घेतला जाईल

प्रशिक्षित व प्रोत्साहित कर्मचारी वर्गाद्वारे ग्राहकांना सेवा पुरविली जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल. तसेच नागरिकांच्या गाऱ्हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यात येईल व तक्रारशुन्य सेवा असल्याची खात्री करण्यात येईल.

**९. परिशिष्टे :**

अ) मुख्यालय दर्शविणारा वृक्षतक्ता

ब) कार्यपूर्तीचे वेळापत्रक

## परिशिष्ट अ

## कार्यपुर्तीचे वेळापत्रक
## सार्वजनिक बांधकाम मंडळ, रत्नागिरी.

| अ. क्र. | कार्यसूची | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी | कार्यपूर्तीचा कालावधी मर्यादा. |
|---|---|---|---|
| १ | कंत्राटदार वर्ग १अ,१ब,१क,२ व ३ यांची नोंदणी व नुतनीकरण | सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय,मुंबई | ७५ दिवस |
| २ | कंत्राटदार वर्ग ४ व ४(अ) नोंदणी व नुतनीकरण | मुख्य अभियंता, प्रादेशिक विभाग कार्यालय | ६० दिवस |
| ३ | कंत्राटदार वर्ग-५,६ आणि बेरोजगार अभियंतांचे नोंदणीकरण व मजूर सहकारी संस्था वर्ग-अ यांचे वर्गीकरण व नूतनीकरण | अधीक्षक अभियंता | ३० दिवस |
| ४ | कंत्राटदार वर्ग ७,८,९ आणि मजूर कामगार सहकारी संस्था वर्ग-ब यांचे वर्गीकरण, इमारत देखभाल व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची परिक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचे वर्ग-७ मध्ये नोंदणीकरण व नतुनीकरण | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |
| ५ | रस्त्याच्या कडेला असलेल्या इमारतींचा ना-हरकत परवाना | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |
| ६ | पेट्रोल पंप आणि पेट्रोल पंपाच्या पोहोच मार्गाचे ना-हरकत प्रमाणपत्र | शासन | ६० दिवस |
| ७ | रस्ता ओलांडून जाणाऱ्या वाहिन्यांसाठी ना-हरकत प्रमाणपत्र | मुख्य अभियंता- राष्ट्रीय महामार्ग.<br>अधीक्षक अभियंता- इतर मार्गांसाठी. | ३० दिवस |
| ८ | विश्रामगृहाचे आरक्षणपत्र उपलब्धता | कार्यकारी अभियंता | ७ दिवस.<br>ऑनलाईन सुविधा उपलब्ध |
| ९ | सरकारी इमारतींचे ना उपलब्धता प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| १० | चलत चित्रपटगृहाचे योग्यता प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| ११ | सरकारी निवासस्थान मिळणेसाठी प्रतिक्षा यादी क्रमांक | कार्यकारी अभियंता | ७ दिवस |
| १२ | सरकारी निवसस्थान न मिळणेचे प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | ७ दिवस |
| १३ | रास्त भाडे/प्रमाणभाडे प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| १४ | इमारतींच्या भाडयांचे निश्चितीकरण | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| १५ | इमारतींचे मुल्यनिश्चितीकरण | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |

# परिशिष्ट

# फ्लो चार्ट

**अर्धक्षिक अभियंता**

**सहाय्यक अर्धक्षिक अभियंता**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग चिपळूण | कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग उत्तर रत्नागिरी | कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग दक्षिण रत्नागिरी | कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, रत्नागिरी | कार्यकारी अभियंता, जि.प.बांधकाम विभाग रत्नागिरी | कार्यकारी अभियंता, जि.प.बांधकाम विभाग चिपळूण | कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग कणकवली | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग सावंतवाडी | कार्यकारी अभियंता, जि.प.बांधकाम विभाग सिंधुदुर्ग |
| उप-कार्य.अभियंता सा.बां.विभाग चिपळूण | उप-कार्य.अभियंता सा.बां.विभाग, उत्तर रत्नागिरी | उप-कार्य.अभियंता सा.बां.विभाग दक्षिण रत्नागिरी | उप-कार्य.अभियंता मा.प्र.विभाग, रत्नागिरी | उप-कार्य.अभियंता जि.प.बांधकाम रत्नागिरी | उप-कार्य.अभियंता जि.प.बांधकाम चिपळूण | उप-कार्य.अभियंता सा.बां.विभाग कणकवली | उप-कार्य.अभियंता सा.बां.विभाग सावंतवाडी | उप-कार्य.अभियंता जि.प.बांधकाम सिंधुदुर्ग |
| उप अभियंता, सा.बां.उपविभाग चिपळूण | उप अभियंता, सा.बां.उपविभाग क्र.१ रत्नागिरी | उप अभियंता, रा.म.उपविभाग क्र.१ चिपळूण | उप अभियंता मार्ग प्रकल्प उपविभाग क्र.१ दापोली | उप अभियंता जि.प.उपविभाग रत्नागिरी | उप अभियंता जि.प.उपविभाग दापोली | उप अभियंता, सा.बां.उपविभाग देवगड | उप अभियंता, सा.बां.उपविभाग मालवण | उप अभियंता जि.प.उपविभाग कणकवली |
| उप अभियंता, सा.बां.उपविभाग खेड | उप अभियंता, सा.बां.उपविभाग क्र.४ रत्नागिरी | उप अभियंता, सा.बां.उपविभाग क्र.२, रत्नागिरी | उप अभियंता मार्ग प्रकल्प उपविभाग क्र.२ चिपळूण | उप अभियंता जि.प.उपविभाग देवरुख | उप अभियंता जि.प.उपविभाग खेड | उप अभियंता, सा.बां.उपविभाग क्र.१ कणकवली | उप अभियंता, सा.बां.उपविभाग क्र.१ कडाळ | उप अभियंता जि.प.उपविभाग सावंतवाडी |
| उप अभियंता, सा.बां.उपविभाग गुहागर | उप अभियंता, सा.बां.उपविभाग देवरुख | उप अभियंता, रा.म.उपविभाग साखरपा | उप अभियंता मार्ग प्रकल्प उपविभाग क्र.३, रत्नागिरी | उप अभियंता जि.प.उपविभाग (वर्क्स) रत्नागिरी | उप अभियंता जि.प.उपविभाग चिपळूण | | उप अभियंता, सा.बां.उपविभाग वेंगुर्ला | उप अभियंता जि.प.उपविभाग कुडाळ |
| उप अभियंता, सा.बां.उपविभाग मंडणगड | उप अभियंता, सा.बां.उपविभाग लांजा | उप अभियंता, रा.म.उपविभाग क्र.३ खारेपाटण | उप अभियंता मार्ग प्रकल्प उपविभाग क्र.४, कणकवली | उप अभियंता जि.प.उपविभाग राजापूर | | | उप अभियंता, सा.बां.उपविभाग क्र.१ सावंतवाडी | उप अभियंता जि.प.उपविभाग (डीआरडीए)कडाळ |
| उप अभियंता, सा.बां.उपविभाग दापोली | उप अभियंता, सा.बां.उपविभाग राजापूर | उप अभियंता, रा.म.उपविभाग सावंतवाडी | उप अभियंता मार्ग प्रकल्प उपविभाग क्र.५, कडाळ | उप अभियंता जि.प.उपविभाग लांजा | | | उप अभियंता, सा.बां.उपविभाग दोडामार्ग | उप अभियंता जि.प.उपविभाग मालवण |
| उप अभियंता, रो.ह.यो.(सा.बां.) उपविभाग,चिपळूण | उप अभियंता यांत्रिकी उपविभाग, रत्नागिरी | | | उप अभियंता जि.प.उपविभाग (इमारती)गुहागर | | | | उप अभियंता जि.प.उपविभाग देवगड |